महाराष्ट्रात थेट विक्री करणाऱ्या कंपन्या आणि थेट विक्रेते यांच्या वरील देखरेख / पर्यवेक्षण या करिता समिती गठित करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः केशाप-२०२२/प्र.क्र.६२/ग्रासं-२**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई - ४०००३२
तारीख : ११ जानेवारी, २०२३.

संदर्भ: Consumer Protection (Direct Selling) Rules, २०२१.

**प्रस्तावना -**

केंद्रीय ग्राहक व्यवहार, अन्न आणि सार्वजनिक वितरण मंत्रालय यांनी त्यांच्या. दिनांक २८ डिसेंबर, २०२१ च्या अधिसूचनेद्वारे Consumer Protection (Direct Selling) Rules, २०२१ अधिसुचित केलेले आहे. यातील नियम ११ मध्ये थेट विक्री करणाऱ्या कंपन्या आणि थेट विक्रेता या नियमांच्या पूर्तता करत असल्याची खात्री करण्याकरीता अशा थेट विक्री करणाऱ्या कंपन्या आणि थेट विक्रेता यांच्या कार्यवाहीवर देखरेख किंवा पर्यवेक्षण करण्याच्या अनुषंगाने राज्य शासनाने यंत्रणा स्थापित करावयाची असून त्याकरीता पर्यवेक्षण समिती गठित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय -**

सदर शासन निर्णयान्वये महाराष्ट्रात थेट विक्री करणाऱ्या कंपन्या आणि थेट विक्रेते यांच्या वरील देखरेख/पर्यवेक्षण या करिता खालील प्रमाणे समिती गठित करण्यात येत आहे:-

| | | |
|---|---|---|
| १. | अध्यक्ष | सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग. |
| २. | सदस्य | सचिव, वित्त विभाग किंवा त्यांनी नामनिर्देशित केलेला वित्त विभागातील अधिकारी. |
| ३. | सदस्य | सचिव, उद्योग ऊर्जा व कामगार विभाग किंवा त्यांनी नामनिर्देशित केलेला उद्योग ऊर्जा व कामगार विभागातील अधिकारी. |
| ४. | सदस्य | महासंचालक, वस्तु व सेवा कर संचालनालय, मुंबई किंवा त्यांनी नामनिर्देशित केलेला अधिकारी. |
| ५. | सदस्य | अतिरिक्त पोलिस महासंचालक, (आर्थिक गुन्हे) किंवा त्यांनी नामनिर्देशित केलेला अधिकारी. |
| ६. | सदस्य सचिव | नियंत्रक, वैध मापन शास्त्र, मुंबई, महाराष्ट्र. |
| ७. | सदस्य | राज्य शासनाने नामनिर्देशित केलेले विशेष तज्ञ/सल्लागार प्राधान्याने थेट विक्री उद्योग संघ यांचे किमान दोन असे चार पेक्षा अधिक असणार नाहीत इतके प्रतिनिधी. |

IDSJNS
INDIAN DIRECT SELLER
& JAN NYAY SURAKSHA
DIRECT SELLER & TEAM LEADER PROTECTION
JUSTICE

या समितीची कार्यकक्षा खालीलप्रमाणे राहिल-:

१. थेट विक्री कंपनी आणि थेट विक्रेता हे Consumer Protection (Direct Selling) Rules, २०२१ च्या तरतूदीचे पालन करतील याची खात्री करणे.
२. थेट विक्री कंपनी आणि थेट विक्रेता यांच्या कार्यवाहीचे देखरेख/पर्यवेक्षण करणे.
३. समितीची बैठक प्रत्येक ३ महिन्याच्या कालावधी नंतर किंवा अध्यक्षांच्या सहमतीने त्यापूर्वी आयोजित करणे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२३०१११११४५१५६०२०६ असा आहे. हा शासन आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**शितल रामटेके**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) मा. मंत्री, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
२) सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
३) सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
४) सचिव, उद्योग ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.
५) महासंचालक, वस्तु व सेवा कर संचालनालय, मुंबई.
६) अतिरिक्त पोलीस महासंचालक, (आर्थिक गुन्हे), मुंबई.
७) नियंत्रक, वैध मापन शास्त्र, मुंबई.
८) निवड नस्ती (ग्रा.सं.२).

IDSJNS INDIAN DIRECT SELLER JUSTICE